# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 28.08.2025** **वार-गुरुवार**

---

**गणेश विसर्जन**

पुण्याच्या वैभवशाली सार्वजनिक गणेशोत्सवाला काल उत्साहात सुरुवात झाली असून शहराच्या मध्य भागात गणेशभक्तांची मोठी गर्दी होताना दिसत आहे. तर दुसरीकडे दीड दिवसांच्या घरगुती गणरायांचं आज भावपूर्ण वातावरणात विसर्जन करण्यात येत आहे. गणपती विसर्जनासाठी पुणे महापालिकेनं सर्व यंत्रणा सज्ज ठेवल्या आहेत. कृत्रिम हौद आणि लोखंडी टाक्यांमध्ये विसर्जनाची सोय केली आहे. निर्माल्य कलशांची व्यवस्थाही करण्यात आली असून मूर्तीदान केंद्रं उभारण्यात आली आहेत. निर्माल्य, प्लास्टीक नदीपात्रात किंवा अन्यत्र टाकू नये अशा सक्त सूचना देण्यात आल्या आहेत.

पिंपरी चिंचवड शहरातही आज भावपूर्ण वातावरणात दीड दिवसाच्या गणपतीचं विसर्जन होत आहे. महापालिकेच्या वतीने शहरात 90 ठिकाणी विसर्जनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या घाटांवर अग्निशामन पथकं, सुरक्षारक्षक तैनात करण्यात आले आहेत. तसंच पोलीस बंदोबस्तही ठेवण्यात आला आहे.

**ऋषिपंचमी**

दरम्यान आज ऋषीपंचमी निमित्त पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती समोर ३५ हजार महिलांनी सामूहिक अथर्वशीर्ष पठण केलं.

न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग प्रशालेत, आज ऋषिपंचमीनिमित्त, सामाजिक क्षेत्रात ऋषितुल्य कार्य करणाऱ्या, व्यक्तींचे पूजन विद्यार्थ्यांनी केलं. यामध्ये चित्रकला क्षेत्रात योगदान देणारे प्रभाकर दिवाकर, सुधाकर चव्हाण आणि डॉक्टर श्याम दामले यांना शाळा समिती अध्यक्ष डॉक्टर शरद अगरखेडकर यांच्या हस्ते मानपत्र देऊन गौरवण्यात आलं.

पुण्यातील माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी माध्यमिक विद्यालयातही आज ऋषिपंचमीनिमित्त ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व ज्येष्ठ बासरीवादक आणि केशव वेणू या जगप्रसिद्ध बासरीचे जनक डॉ. पंडित केशव गिंडे गुरुजी आणि ज्येष्ठ ब्रह्मविद्या साधक जयंत फडके यांचा सन्मान करण्यात आला.

**<u>मिरवणूक</u>**

गणेशोत्सवाच्या काळात पुण्यात अनेक नवनवीन उपक्रम आयोजित केले जातात. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर धनकवडी इथल्या ११ गणेश मंडळांनी एकत्रितपणे मिरवणूक काढत काल मायमराठीचा जागर केला. भाषेच्या गौरव रथावर गणपती विराजमान झाले होते. बुद्धीच्या देवतेला पुस्तकांचा नैवेद्य अर्पण करून मिरवणूक मार्गावर 10 हजार मराठी पुस्तकांचं वितरण करण्यात आलं. मराठी भाषा शिकवणाऱ्या पाचशे शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी आमदार भीमराव तापकीर, माजी नगरसेवक विशाल तांबे, वर्षा तापकीर आणि काही परदेशी पाहुणेही उपस्थिती होते.

**<u>पुणे फेस्टिवल</u>**

सदतिसाव्या 'पुणे फेस्टिव्हल' चं औपचारिक उद्घाटन उद्या संध्याकाळी केंद्रीय पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांच्या हस्ते गणेश कला-क्रीडा मंच इथं होणार आहे. माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रकांत पाटील, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थितीत राहणार आहेत.

दरम्यान पुणे फेस्टिवल अंतर्गत विविध कार्यक्रमांना प्रारंभ झाला आहे. पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने बालगंधर्व कलादालनात वृत्तपत्र छायाचित्रकारांनी काढलेल्या छायाचित्रांचं प्रदर्शन भरवण्यात आलं आहे. या प्रदर्शनाचं उद्घाटन माजी आमदार उल्हासदादा पवार यांच्या हस्ते आज झालं. वृत्तपत्रातील छायाचित्र अर्थपूर्ण आणि बोलकी असतात, अशा शब्दांत माजी उल्हासदादा पवार यांनी वृत्तपत्र छायाचित्रकारांचं कौतुक केलं.

समाजमाध्यमांवर अनेक तथ्यहीन आणि आशयहीन छायाचित्र पाहिल्यावर वृत्तपत्रातील छायाचित्रांचं महत्त्व अधिक अधोरेखित होतं, असं मत खासदार प्रणिती शिंदे यांनी यावेळी व्यक्त केलं.

**<u>क्रीडा दिन</u>**

राज्य शासनाच्या शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागातर्फे उद्या पुण्यात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील पदक विजेत्यांना पारितोषिकानं गौरवण्यात येणार आहे. म्हाळुंगे बालेवाडी इथल्या क्रीडा संकुलात हा समारंभ होईल. उत्तराखंडमध्ये फेबुवारीत झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील पदकविजेत्यांना तीन ते सात लाख रुपयांपर्यंतची बक्षिसं दिली जाणार आहेत. मार्गदर्शकांनाही वीस ते पन्नास हजार रुपयांपर्यंतची पारितोषिकं दिली जाणार आहेत.

**<u>प्रदूषण</u>**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या निर्देशांनुसार बांधकाम प्रकल्पांच्या ठिकाणी वायू गुणवत्ता तपासणीसाठी सेन्सरवर आधारित प्रणाली उभारणं आवश्यक आहे. त्यानुसार बाधकामांच्या ठिकाणी होत असलेल्या प्रदूषणावर नियंत्रण मिळविण्यासाठी या प्रकल्पाच्या ठिकाणी सेन्सर आधारित वायू गुणवत्ता तपासणी प्रणाली उभारण्याची सूचना पुणे महापालिकेने बांधकाम व्यावसायिकांना केली आहे. या प्रणालीमुळे आता बांधकामांच्या ठिकाणी किती वायू प्रदूषण होत आहे, याची माहिती मिळणार आहे, तसंच प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजनाही करता येणार आहेत.

**<u>मनोज जरांगे आरक्षण</u>**

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात अंतरवाली सराटीतून निघालेली यात्रा आज सकाळी पुण्यातील शिवनेरीवर पोहचली. यावेळी शिवनेरी किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मस्थळाचे दर्शन घेऊन आंदोलक मुंबईकडे निघाले आहेत. दरम्यान ही यात्रा जुन्नरच्या जवळ असताना सतीश देशमुख या आंदोलकाचा आज हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज पावसाच्या काही हलक्या सरी बरसल्या. उद्याही शहर परिसरात हलक्या पावसाचा अंदाज असून घाट परिसरात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा पुणे वेधशाळेनं दिला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**